# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक १५ जुलै, २०१३

## ( सकाळी ११.०० वाजता )

**शुभारंभ** : **वंदे मातरम्.**

**एक** : **मंत्र्यांचा परिचय.**

**दोन** : **नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय.**

**तीन** : **प्रश्नोत्तरे -**

**चार** : **शोक प्रस्ताव -**

सर्वश्री दिनकर बाळू ऊर्फ दि.बा.पाटील, जनार्दन मोरेश्वर ऊर्फ आप्पा गोगटे, लिंगराज बालईरय्या वल्याळ, मोहनराव आबासाहेब गाडे, संपतराव गणपतराव अवघडे, श्रीमती रुक्मिणीबाई विठ्ठलराव वाजे तसेच सर्वश्री परचाराम केवलराम आयलानी, विठ्ठल पुरभाजी गायकवाड, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**पाच** : अध्यक्ष, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करतील.

**सहा** : **पुढील अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात येतील :-**

(१) **उप मुख्यमंत्री** : सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक ७- महाराष्ट्र आकस्मिकता निधी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

(२) **कृषि मंत्री** : सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक १०- महाराष्ट्र कृषि विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

(३) **सहकार मंत्री** : सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक ६- महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

**(४) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** : (क) सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक ८- महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

(ख) सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक ९- महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

(ग) सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक १३ - महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

**(५) शालेय शिक्षण मंत्री** : (क) सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक ११ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

: (ख) सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक १२- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील.

**सात** : सन २०१३-२०१४ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**आठ** : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.

**नऊ** : **स्थगन प्रस्तावाच्या सूचना- (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**दहा** : **शासकीय विधेयके :-**

(क) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचा प्रस्ताव - (म.वि.स. नियम १५४ अन्वये) :-**

"सन २०१३ चे विधानपरिषदेने संमत केलेले विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मिळावी."

(ख) **पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र कृषि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३.

(२) सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३.

(३) सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३.

(४) सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) विधेयक, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १४ जुलै, २०१३.